


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड - महाराष्ट्र | गुरूवार दि. २३ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३५ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये




RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27| https://epaper.marathwadapatra.com| E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

## बारामतीत मतदानासाठी येणार नाहीत शरद पवार



## सुनेत्रा पवारांची पहिली प्रतिक्रिया आली समोर...

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी (ता. २३) मतदान आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे मात्र मतदानाला येणार नाही. त्यांची प्रकृती ठीक नसल्याने डॉक्टरांनी त्यांना सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला दिला आहे. शरद पवार यांनीच सोशल मीडियात पोस्ट करत मंगळवारी ही माहिती दिली होती. त्यावर आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

सुनेत्रा पवार या बारामती मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार आहेत. त्यांच्याविरोधात कोणत्याही प्रमुख पक्षाचा उमेदवार रिंगणात नाही. त्यामुळे ही लढत एकतर्फी ठरली आहे. असे असूनही मताधिक्य किती असणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. त्यामुळे अधिकाधिक मतदान व्हावे, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रयत्न केले जात आहेत.

दरम्यान, सुनेत्रा पवार यांनी शरद पवार मतदानाला येणार नसले तरी त्यांचे आशीर्वाद लाखमोलाचे असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सोशल मीडियात पोस्ट करत म्हटले आहे की, प्रकृती अस्वास्थ्यामुळे आदरणीय पवार साहेब बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतदानास उपस्थित राहू शकणार नाहीत. मात्र त्यांचे आशीर्वाद माझ्यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● काय म्हणाले होते शरद पवार ?

**शरद पवार यांनी सोशल मीडियात पोस्ट करत म्हटले होते की, पोटनिवडणुकीसाठी बारामती येथे येऊन आतापर्यंतच्या प्रघातानुसार मतदान करण्याचे मी ठरवले होते. दुर्दैवाने माझी प्रकृती बिघडल्याने मला मुंबईत रुग्णालयात दाखल व्हावे लागले. डॉक्टरांनी मला उपचार आणि सक्तीची विश्रांती या कारणास्तव मुंबईबाहेर जाण्यास मनाई केली आहे. त्यामुळे अत्यंत नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावण्यापासून मला वंचित रहावे लागत आहे, हे मी अत्यंत व्यथित आणि खेदपूर्ण अंत:करणाने सांगू इच्छितो.**







## बीड जेलमध्ये कराड गँगची दहशत? ऑडिओ क्लिप व्हायरल

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणातील आरोपींची दहशत आता जेलमध्येही सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार कथित व्हायरल ऑडिओ क्लिप मुळे समोर आला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड आणि त्याच्या गँगमधील सदस्यांविरोधात यामधून गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

काय आहे संपूर्ण प्रकरण? बीड जिल्हा कारागृहात कैद असलेल्या सुदर्शन घुले, प्रतीक घुले आणि त्यांच्या साथीदारांनी एका कैद्याला बेदम मारहाण केल्याचा दावा एका कथित ऑडिओ क्लिपमधून करण्यात आला आहे. ही ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असली तरी तिची अधिकृत पडताळणी अद्याप झालेली नाही.



व्हायरल ऑडिओ क्लिपमधील धक्कादायक दावा- कथित ऑडिओमध्ये संबंधित कैदी आपल्या नातेवाईकाशी बोलताना सांगतो की,सहा नंबरच्या बराकमध्ये त्याला निर्दयपणे मारहाण करण्यात आली या मारहाणीत त्याचा हात मोडला असून गंभीर दुखापत झाली आहे

जेलमधील काही पोलिस आरोपींशी संगनमत करून तक्रारींकडे दुर्लक्ष करत आहेत. तसेच, आमचं कोणी काही वाकडं करू शकत नाही अशा प्रकारच्या धमक्या देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. प्रशासनावरही गंभीर आरोप- संबंधित कैद्याने जेल प्रशासनावरही गंभीर आरोप केले आहेत पोलिसांनी आरोपींकडून ▶▶ उर्वरित पान २ वर

## कल्पना खरातकडून पती अशोक खरातच्या पापांचा पाढा

**नाशिक । प्रतिनिधी**

भोंदू अशोक खरात हा लैंगिक अत्याचारासह अनेकांची फसवणूक करण्याच्या प्रकरणात दिवसेंदिवस अडकत आहे. या प्रकरणबाबत आता एक मोठा ट्विस्ट समोर आला आहे. सध्या नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात हा चर्चेचा विषय ठरत आहे. त्याच्या विरोधात रोज नव नविन गुन्हे उघड होत आहेत. त्याच्या विरोधात आता नविन खुलासा समोर येत आहे. लैंगिक अत्याचारासह अनेकांची फसवणूक करणारा भोंदू अशोक खरात दिवसेंदिवस अडचणीत सापडत आहे. आता या प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर



## बीड येथील नवीन पंचतारांकित एमआयडीसी संदर्भात आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट

## पुढच्या आठवड्यात होणार मंत्रालय स्तरावर बैठक



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे नवीन पंचतारांकित एमआयडीसी निर्माण करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांचा नियमित पाठपुरावा सुरू आहे. त्या अनुषंगाने बुधवारी (दि.२२) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यावर उद्योगमंत्री यांनी पुढील आठवड्यात या विषयावर मंत्रालय स्तरावर बैठक आयोजित करण्याचे निर्देश संबंधितांना दिले आहेत. बीड हा औद्योगिक आणि शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने मागासलेला जिल्हा आहे. बीड जिल्ह्यात विकास ▶▶ उर्वरित पान २ वर

## ...म्हणून अश्विनी बनायची रुकसाना

## पोलिसांच्या सीक्रेट मिशनमुळे अनेक धक्कादायक गोष्टी समोर!

**मुंबई । प्रतिनिधी**



ड्रग्ज सप्लायर अश्विनी पॉलचा माग काढणे हे पोलिसांसाठी मोठे आव्हान होते. पण, त्यांनी भन्नाट आयडिया लढवली. पालिका सर्व्हेच्या नावाखाली टिटवाळा येथील पद्मावती कॉम्प्लेक्समध्ये एंट्री केली. अखेर अश्विनीचे घर सापडले आणि लगेच छापा घातला, तेव्हा अश्विनीने स्वत:ला बार गर्ल असल्याचे सांगितले. पण, पोलिसांचे लक्ष घरातील कचऱ्याच्या डब्याकडे गेले आणि डबा उघडताच त्यात लपलेले ६ कोटींच्या ५ हजार एक्स्टसी गोळ्याचे गुपित समोर आले. चौकशीत तिचा लिव्ह-इन पार्टनर अमीर सय्यद हा ड्रग्ज पुरवठा करत होता आणि अश्विनी त्याची विक्री करायची. मंगळवारी रात्री उशिराने अमीरलाही अटक केली आहे. अमीर आणि अश्विनी दोघे मिळून हे रॅकेट चालवत होते. अमीरच्या चौकशीतून या पुढची लिंक हाती लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अश्विनी दोन महिन्यांपूर्वीच टिटवाळा येथील घरात भाड्याने राहण्यास गेली होती. पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर कक्षाचे वरिष्ठ पोलिस ▶▶ उर्वरित पान २ वर

## ...मग बॉम्बस्फोट कुणी केला ?

### ३७ जणांचा जीव घेणाऱ्या मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी निर्दोष सुटले, लोकांचे प्रश्न कायम



**मालेगाव । प्रतिनिधी**

२००६ साली मालेगावला करण्यात आलेला बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपीची कोर्टाने निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपीची निर्दोष मुक्तता झाल्यामुळे मालेगावच्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसंच, ४ ठिकाणी बॉम्बस्फोट केला कुणी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मालेगाव शहरातील बडा कबरस्थान, मुशावर चौकसह इतर ४ ठिकाणी २००६ साली बॉम्बस्फोट करण्यात आला होता. या ▶▶ उर्वरित पान २ वर

बेसिक कोचिंग क्लाससेस,बीड

इयत्ता १ ली ते १० वी सेमी

समर व्हॅकेशन बॅचेस

कालावधी २० एप्रिल ते १ जुन पर्यंत

१६ वर्षाची यशस्वी परंपरा

संचालक : वायभट एम.यु. MO : 8575717171

प्रवेश देणे सुरु आहे

पत्ता : रेणु हॉस्पिटल शेजारी, शिवाजी धांडे नगर, बार्शी रोड, बीड

## लालपरी'ला नवं ग्लॅमर! रितेश देशमुख आणि जेनेलिया बनले एसटीचे ब्रँड ॲम्बेसिडर




**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जनतेची जीवनरेखा असलेल्या 'लालपरी' म्हणजेच Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC) ला आता नवं ग्लॅमर मिळणार आहे. मराठमोळे लोकप्रिय कलाकार रितेश देशमुख आणि जेनेलिया देशमुख यांची एसटी महामंडळाच्या ब्रँड ॲम्बेसिडर (सदिच्छा दूत) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रवाशांनी अधिकाधिक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा आणि खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी व्हावे, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामीण ते शहरी भागांपर्यंत एसटी सेवा अधिक ▶▶ उर्वरित पान २ वर

## आरेफ आली नगर भागातील रस्ता व नालीचा प्रश्न प्राधान्याने सोडवू: आ. विजयसिंह पंडित

### बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला बळ: जाफर ईनामदार यांचा समर्थकांसह पक्षप्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देत जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी बीड मधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी आ. श विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत जाफर ईनामदार यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे बीड शहरातील राजकीय समीकरणांना नवे बळ मिळाले असून पक्षाची ताकद अधिक भक्कम झाली आहे, आरेफ नगर भागातील रस्ता नालीसह इतर विकासाचे प्रश्न प्रामुख्याने सोडवल्या जातील कार्यकर्त्यांना सन्मान दिला जाईल अशी ग्वाही यावेळी आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे.



मंगळवार दि .२२एप्रिल रोजी हा प्रवेश सोहळा नगरसेवक बिलाल शेख आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी आमेर ईनामदार, रिजवान भाऊ, हमीद भाई, निसार भाई, मुस्तफा भाई, महमुद भाई, महेबुब भाई, कादिर अजहर भाई आणि सलीम भाई यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश करत विकासाच्या प्रवाहात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस हा ▶▶ उर्वरित पान २ वर

पाहिजेत

● सिस्टर- (१ जागा)
ANM, GNM
अनुभव असल्यास प्राधान्य
(रात्रपाळीसाठी)

● मावशी- (२ जागा)
काम येणाऱ्यास प्राधान्य
(रात्रपाळीसाठी)


● भेटण्याची वेळ ११ ते २

-: संपर्क :-
जेथलिया हॉस्पिटल
जालना रोड, बीड
मो.क्रं. ७०२०५०३८३६

# पुस्तकांची अमूल्य शक्ती ओळखा

१९९५ पासून, युनेस्को दरवर्षी २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन साजरा करत असून, १०० हून अधिक देशांमध्ये वाचन, प्रकाशन आणि कॉपीराइटला प्रोत्साहन देत आहे. हा विशेष दिवस आपल्याला पुस्तकांच्या अधिक जवळ जाण्यासाठी आणि आपल्या जीवनात त्यांचे महत्त्व अंगीकारण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रेरणा देतो. या वर्षी २०२६ च्या जागतिक पुस्तक दिनाची संकल्पना आवडीनुसार वाचन करा ही असून, वाचनाच्या छंदाला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या शैलीतून हे दिसून येते की, तुम्हाला ज्या प्रकारच्या साहित्यात रस असेल, ते वाचा आणि वाचनाची सवय लावा. पुस्तके ही जीवनाचे प्रतिबिंब असतात, पुस्तके आपल्याला सत्य आणि नीतिमत्तेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात. पुस्तके ही जीवनाचे प्रतिबिंब असतात, पुस्तके आपल्याला सत्य आणि नीतिमत्तेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात. जगभरातील महान व्यक्ती त्यांच्या विशेष कामगिरीमुळे प्रसिद्ध झालेत. पैसा, प्रसिद्धी, नाव, काम आणि व्यस्तता असूनही आणि दर मिनिटाला लाखो रुपये कमावत असूनही, उद्योगपती, खेळाडू, राजकारणी आणि चित्रपट नायकसुद्धा दररोज पुस्तकं वाचण्यासाठी आपल्या मौल्यवान वेळेतील काही क्षण काढतात.

आर्थिक अडचणी असताना, एक वेळचे जेवण टाळून आणि त्यातून पैसे वाचवून पुस्तके विकत घेण्याचा प्रयत्न आपण कधी केला आहे का ? जगात ज्ञानाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कठीण काळात पुस्तके विकत घेण्यासाठी एक वेळचे जेवणही सोडले होते. जेणेकरून आपण ज्ञानाचे मूर्तिमंत स्वरूप असलेल्या पुस्तकांचे तेज आत्मसात करू शकू. हीच पुस्तकांबद्दलची तळमळ, आवड आणि त्यांच्या महत्त्वाचे आकलन होय. बहुतेक मोठ्यालोकांकडे, त्यांच्या घरी पुस्तकांचा संग्रह असतो, पुस्तकें वाचायला, जपायला आवडतात, म्हणजेच एक वैयक्तिक ग्रंथालय. जगात पुस्तकांपेक्षा उत्तम सोबती नाही. पुस्तके आपल्याला नेहमी योग्य दिशेने मार्गदर्शन करतात. पुस्तके आपला फावला वेळ देखिल ज्ञानाने भरून टाकतात. पुस्तके बुद्धीला तीक्ष्ण, जागरूक आणि विवेकी बनवून आपण सत्य आणि असत्य यांतील फरक ओळखायला शिकतो. पुस्तके आणि शिक्षणाच्या माध्यमातून आपण जगभरातील प्रत्येक क्षेत्रात सर्वोच्च स्थान प्राप्त करू शकतो.



जागतिक पुस्तक दिन हा वाचन, पुस्तके, प्रकाशन, लेखकांचा गौरव आणि कॉपीराइट जागृतीला प्रोत्साहन देण्यासाठी साजरा केला जातो. आजही आधुनिक जीवनात पुस्तकांचे महत्त्व अतुलनीय आहे. पुस्तके शिकवतात, प्रेरणा देतात, मनोरंजन करतात आणि आपल्याला वेगवेगळ्या भाषा, संस्कृती व पिढ्या मध्ये जोडतात. जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिनाची मुख्य उद्दिष्ट्ये सर्व वयोगटातील लोकांसाठी पुस्तके अधिक सुलभ करणे, वाचनाच्या सवयीला प्रोत्साहन देणे, प्रकाशन आणि साहित्यिक संस्कृतीला चालना देणे, बौद्धिक संपदेबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि समाजातील प्रत्येक वाचकाला पुस्तके सहज उपलब्ध होतील याची खात्री करणे हे आहेत. पुस्तके कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता विकसित करतात, भाषा आणि संवाद कौशल्ये सुधारतात, संस्कृती आणि इतिहासाचे जतन करून विविध पिढ्यांमधील वाचकांना जोडतात, आणि शिक्षण घेण्यास व आजीवन शिकण्यास प्रोत्साहन देतात. नियमित वाचनामुळे शब्दसंग्रह, एकाग्रता, आत्मविश्वास आणि विचारशक्ती सुधारतात.

आजचा 'जागतिक पुस्तक दिन' हा पुस्तकांचा आनंद आणि सामर्थ्य साजरे करण्याची एक उत्तम संधी आहे. एखादे नवीन आवडते पुस्तक वाचून, ग्रंथालयांना भेट देऊन, मित्र, नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तींसोबत पुस्तकांची देवाणघेवाण करून किंवा इतरांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून हा दिवस साजरा केला पाहिजे. आपल्याला आवडत्या पुस्तकांवर इतरांशी किंवा मित्रांशी चर्चा करावी, आपल्याला ते पुस्तक का आवडते आणि इतर वाचकांनी ते का वाचले पाहिजे, हे स्पष्ट करावे, जेणेकरून इतर लोकांनाही प्रेरणा मिळेल आणि ते पुस्तक वाचण्याची उत्सुकता निर्माण होईल. चांगल्या पुस्तकांना नेहमी प्रोत्साहन दिले पाहिजे, जेणेकरून दर्जेदार पुस्तके वाचकांपर्यंत सहज पोहोचू शकतील. जो व्यक्ती पुस्तकांशी मैत्री करतो, त्याला यशाच्या मार्गावर जाण्यापासून कोणीही कधीही रोखू शकत नाही, कारण समस्येचे समाधान पुस्तकांमध्येच दडलेले असते. पुस्तके कधीही तक्रार करत नाहीत ; ती केवळ ज्ञानाची नदी वाहत ठेवतात. ज्यांनी त्यांना स्वीकारले ते समृद्ध झाले, तर ज्यांनी त्यांचे महत्त्व दुर्लक्षित केले ते मागे पडले.

आजच्या इंटरनेटच्या युगात पुस्तकांचे स्वरूप डिजिटल झाले आहे, पुस्तके आपल्याला फक्त एका क्लिकवर सहज उपलब्ध होतात, म्हणजेच पुस्तके सहज उपलब्ध असूनही आज वाचनसंस्कृती कमकुवत होत असल्याचे दिसते. तरुण पिढी सोशल मीडियाच्या विळख्यात अडकत आहे, अभ्यासाच्या नावाखाली ते पुस्तकांऐवजी शॉर्टकट नोट्सवर अवलंबून राहणे पसंत करतात. परंतु या शॉर्टकट नोट्स विद्यार्थ्यांना केवळ काही प्रश्नांची मर्यादित उत्तरे देतात आणि त्यांना फक्त नाममात्र पदवी मिळविण्यात मदत करतात. पण जेव्हा एखाद्या विषयाच्या सखोल ज्ञानाचा किंवा जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर त्या ज्ञानाच्या महत्त्वाचा प्रश्न येतो, तेव्हा हेच विद्यार्थी अपयशी ठरतात, कारण या तरुणांनी गहन ज्ञान असलेल्या पुस्तकांचे महत्त्व कधीच समजून घेतलेले नाही किंवा वाचलेले नाही. अशा वातावरणात, जेव्हा जीवनातील परिस्थिती अस्थिर किंवा कठीण होते, तेव्हा माणूस समस्या सहजपणे सोडवण्याऐवजी डगमगतो आणि त्यापासून पळून जातो किंवा पळवाटा शोधतो. त्यामुळे नैराश्य, आत्महत्या, गुन्हेगारी आणि अमली पदार्थांचे व्यसन यांसारख्या समस्या झपाट्याने निर्माण होतात आणि जीवनात अडचणींचा डोंगर उभा राहतो. पुस्तके प्रत्येक अडचणीत आपल्या पाठीशी उभी राहतात, जे त्यांना ओळखतात ते पुन्हा कोणत्याही समस्येत अडकत नाहीत, कारण त्यांना परिस्थितीला कसे सामोरे जायचे हे माहित असते आणि यश त्यांच्या जवळ येत. सर्वप्रथम, पुस्तके वाचण्याची सवय लावा, वेळेचा सदुपयोग करा, ज्ञानी बना व जागरूक व्हा आणि आयुष्यभर पुस्तकांशी मैत्री टिकवून ठेवा, म्हणजे पुस्तके नेहमी आपल्यासोबत राहतील. आनंदी, समाधानी आणि यशस्वी आयुष्य जगण्याची ही खूप सोपी पद्धत आहे.

**– डॉ. प्रीतम भी. गेडाम**

# वाचनसंस्कृतीचा दीपस्तंभ 'जागतिक पुस्तक दिन

२३ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक पुस्तक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ पुस्तकांचा गौरव करण्यापुरता मर्यादित नसून तो ज्ञान, विचार, संस्कृती आणि सर्जनशीलतेच्या जतनाचा व प्रसाराचा उत्सव आहे. मानवी सभ्यतेच्या इतिहासात पुस्तकांनी जे योगदान दिले आहे, ते अनमोल आहे. शब्दांच्या माध्यमातून माणसाने आपल्या अनुभवांना, विचारांना, ज्ञानाला आणि संस्कृतीला आकार दिला आणि ते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवले. त्यामुळे पुस्तक हे केवळ अक्षरांचा संच नसून ते मानवी उत्क्रांतीचे आणि सामाजिक प्रगतीचे सशक्त साधन आहे. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला या महत्त्वाची जाणीव करून देणारा आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी देणारा एक प्रेरणादायी दिवस आहे.

वाचन ही एक सवय नसून ती एक संस्कारप्रक्रिया आहे. वाचनामुळे व्यक्तीच्या विचारशक्तीला चालना मिळते, कल्पनाशक्ती विस्तारते आणि विवेकबुद्धी विकसित होते. एखादे पुस्तक वाचताना वाचक त्या लेखकाच्या अनुभवविश्वात प्रवेश करतो आणि विविध भावविश्वांचा अनुभव घेतो. त्यामुळे वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती आत्मविकासाची एक सर्जनशील यात्रा आहे. वाचनामुळे व्यक्ती अधिक संवेदनशील, विचारशील आणि समंजस बनते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा विचारशील व्यक्तींची आवश्यकता असते. आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीचा स्फोट झाला आहे. मोबाईल, इंटरनेट, सामाजिक माध्यमे यांमुळे माहिती सहज उपलब्ध झाली आहे. परंतु या माहितीच्या महासागरात सखोल ज्ञान हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती ही तात्पुरती आणि तुकड्यांमध्ये मिळणारी असते, तर ज्ञान हे सुसंगत, सखोल आणि टिकाऊ असते. पुस्तक वाचनामुळेच हे सखोल ज्ञान आत्मसात करता येते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करत असतानाही पुस्तक वाचनाची सवय जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल माध्यमे ही पूरक साधने असू शकतात, परंतु त्यांची जागा पुस्तक घेऊ शकत नाही. मराठी साहित्य परंपरा अत्यंत समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, पु. ल. देशपांडे यांसारख्या महान लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. त्यांच्या लेखनातून सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला गेला आणि परिवर्तनाची प्रेरणा दिली गेली. साहित्य हे समाजाचे आरसे आहे, असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे. आजच्या काळात वाचनसंस्कृतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर, वेळेअभावी वाचनाकडे दुर्लक्ष, पुस्तकांच्या वाढत्या किंमती, तसेच ग्रंथालयांची अपुरी संख्या ही काही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः लहान मुलांमध्ये वाचनाची सवय कमी होत चालल्याचे दिसते. त्यामुळे बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी मुलांना पुस्तकांची ओळख करून द्यावी आणि त्यांच्यासोबत वाचनाचा आनंद घ्यावा. तंत्रज्ञानाच्या युगात ई-पुस्तके आणि ऑडिओ पुस्तके यांचा वापर वाढत आहे. ही साधने वाचनासाठी उपयुक्त ठरत असली, तरी पारंपरिक पुस्तकांचे महत्त्व अजूनही कायम आहे. पुस्तक हातात घेऊन वाचण्याचा अनुभव वेगळाच असतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाही पारंपरिक वाचनसंस्कृती जपणे आवश्यक आहे. वाचनसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये आणि शासन यांनी वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. 'दर महिन्याला एक पुस्तक' अशी संकल्पना राबवता येईल.

शेवटी असे म्हणता येईल की, पुस्तक हे मानवाच्या प्रगतीचे खरे साधन आहे. ज्ञान, संस्कार आणि विचार यांचे संगम म्हणजे पुस्तक. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला वाचनाची प्रेरणा देणारा दिवस आहे. आजच्या युगात सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासून ज्ञानसमृद्ध समाजाच्या निर्मितीत आपला वाटा उचलावा, हीच या दिवसाची खरी शिकवण आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे.**

◆ पान १ वरून पुढे...

## बारामतीत मतदानासाठी...

आणि बारामतीकरांसाठी लाखमोलाचे आहेत. बारामतीसह महाराष्ट्राच्या व देशाच्या विकासात आदरणीय साहेबांचे योगदान प्रेरणादायी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदरणीय दादांनीही विकासात्मक राजकारणाची समृद्ध परंपरा जपली. आदरणीय साहेबांनी केलेल्या आवाहनाला बारामतीकर नक्कीच उत्स्फूर्त प्रतिसाद देतील. बारामतीची जनता विकासाच्या विचारांशी जोडलेली आहे आणि तीच दिशा पुढेही कायम राहील. आदरणीय साहेबांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, हीच मनःपूर्वक प्रार्थना, असे सुनेत्रा पवारांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

आमच्या पक्षाने (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार) या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे. स्व. अजित पवार यांना ही एकप्रकारे आमच्या पक्षातर्फे श्रद्धांजलीच आहे. माझे बारामतीमधील सर्व मतदारांना आवाहन आहे की, त्यांनी श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असेही शरद पवारांनी म्हटले होते.

## बीड जेलमध्ये....

पैसे घेतल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून

तक्रार केल्यानंतर उलट धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप केला गेला आहे.जेल अधीक्षकांकडूनही दुर्लक्ष होत असल्याचा दावा

जेल प्रशासनाचे स्पष्टीकरण– या सर्व आरोपांवर प्रतिक्रिया देताना कारागृह अधीक्षक रामराजे चांदणे यांनी सांगितले: कैद्यांमध्ये केवळ शाब्दिक वाद झाला होता. मारहाणीचा कोणताही प्रकार घडलेला नाही. दोन्ही गटांनी लेखी स्वरूपात तक्रार नसल्याचे दिले आहे. सध्या या प्रकरणात दोन वेगवेगळे दावे समोर येत आहेत.एकीकडे गंभीर मारहाणीचे आरोप, तर दुसरीकडे प्रशासनाचा इन्कार.व्हायरल ऑडिओ क्लिपची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच सत्य समोर येणार आहे.

## कल्पना खरातकडून....

अशोक खरातची पत्नी कल्पना खरातने या प्रकरणात आपला कसलाही सहभाग नसल्याचं सांगत या प्रकरणापासून अंतर राखलं आहे. एवढंच नव्हे तर आपल्या पतीने अनेक गंभीर गुन्हे केले, अशी कबुली देखील कल्पना खरातने कोर्टात दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता अशोक खरातच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. खरं तर, अशोक खरातला अटक झाल्यानंतर ३१ मार्चपासून कल्पना खरात फरार आहे. नाशिक पोलीस तिचा सर्वत्र शोध घेत आहेत. मात्र तिचा कुठेच थांगपत्ता लागत नव्हता. दरम्यान, कल्पना खरातकडून अटकपूर्व जामिनासाठी राहाता न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज सुनावणी पार पडली. कल्पना खरातच्या बाजुने कोर्टात वकील प्रशांत गिरी उपस्थित होते. त्यांनी कल्पना खरातची भूमिका मांडताना सर्व आरोप फेटाळून लावले. पती अशोक खरातच्या गुन्ह्यांबाबत मला माहीत नाही. माझ्या पतीने गंभीर गुन्हे केलेत, अशी कल्पना खरातची भूमिका असल्याचं वकिलांनी कोर्टात संगितलं. वकिलांचा युक्तीवाद कोर्टाने ऐकला असून सायंकाळी पाच वाजता कोर्ट याबाबत निर्णय देणार आहे. अशोक खरातच्या विविध गुन्ह्यात कल्पना खरातची साथ होती. तिच्या बँक खात्यातून अनेक व्यवहार झाले. तसेच तिच्या नावे खरातची संपत्ती देखील असल्याचा आरोप करण्यात आला होता.

## ...म्हणून अश्विनी ....

निरीक्षक अनिल ढोले आणि पथकाने तिचा शोध सुरू केला. यावेळी दोन-दोन पोलिसांच्या पथकाने पालिका अधिकाऱ्यांच्या बहाण्याने सर्व्हे सुरू केला. कुणालाही काही माहिती लागू न देता ते अश्विनीच्या घरापर्यंत पोहोचले. अश्विनीचे घर सापडल्याचा ग्रीन सिग्नल मिळताच पथकाने छापा टाकत झाडाझडती सुरू केली. या कारवाईने अश्विनीचा गोंधळ उडाला. मात्र, सुरुवातीला तिनेही आपण फक्त बार गर्ल असेपर्यंतची ओळख पुढे आणली. पोलिसांनी तिचे संपूर्ण घर पिंजून काढले, मात्र हाती काहीच लागले नाही. अखेरीस पोलिसांचे लक्ष कचऱ्याच्या डब्याकडे गेले. त्यांनी ते उघडताच हाती ६ कोटींचे ड्रग्ज लागल्याने अश्विनीचे बिंग फुटले.

कारागृहात जाण्यापूर्वी अश्विनीकडे दिला ड्रग्जचा साठा

अमीर कोर्टात तारखेला हजर राहत नसल्याने डीआरआयच्या प्रकरणात फेब्रुवारीत त्याच्याविरुद्ध वारंट जारी केले होते. कारागृहात जाण्यापूर्वीच फेब्रुवारीमध्ये अमीरने या गोळ्या अश्विनीकडे देत पुढे विक्री करण्यास सांगितले. जेणेकरून त्या विकून अमीरचा पुढचा कोर्ट प्रकरणाचा खर्चही भागेल. अमीर आणि इरफानची ओळख कारागृहात असतानाच झाली. अमीरने यापूर्वीही मोठ्या प्रमाणात गोळ्या इरफानला विक्रीसाठी दिल्याचा संशय आहे. तेथेच अमीरला भेटायला येताना अश्विनीची इरफानसोबत ओळख झाली. त्यानुसार, अमीरचा ताबा घेत त्याला अटक केली.

...म्हणून अश्विनी बनायची रुकसाना

स्वतःची ओळख लपविण्यासाठी अश्विनी बनावट नावाचाही वापर करत होती. यासाठी ती रुकसाना शेख नावाने आधार कार्ड वापरत असल्याचेही समोर आले.

बँक खात्यासह मालमत्तेचा तपास सुरू

एवढ्या मोठ्या किमतीचा साठा घेण्यासाठी किमान १ कोटी तरी दिल्याचा अंदाज आहे. मात्र, हे ड्रग्ज घेण्यासाठी पैसे कुठून आले ?, नेमका हा साठा किती आला होता ?, याच्या तपासासाठी तिच्या बँक खात्यासह मालमत्तांची माहिती काढण्यात येत आहे. बँक खात्यातील माहिती मिळताच पुढे ती रक्कम गोठविण्यात येणार आहे.

## ...मग बॉम्बस्फोट...

स्फोटामध्ये ३७ नागरिकांचा मृत्यू तर ३०० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले होते. या प्रकरणात पोलिसांनी लोकेश शर्मा, धन सिंग, राजेंद्र चौधरी आणि मनोहर नरवारिया यांना अटक करून गुन्हा दाखल केला होता. मात्र मुंबई हायकोर्टाने या चारही आरोपींची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आहे. या निकालाबाबत मालेगावच्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून २००८ आणि २००६ या दोन्ही बॉम्बब्लास्ट मधील सर्व आरोपी निर्दोष आहे तर मग बॉम्ब ब्लास्ट केला कुणी. असा प्रश्न उपस्थित केला जातं आहे. मग स्फोट कुणी केला ? २००६ साली झालेल्या बॉम्ब स्फ़ोट प्रकरणात मला अडकविण्यात आले होते. ५ वर्षे मी तुरुंगात होतो. त्यानंतर आम्हाला जामिनावर सोडण्यात आलं. २०१६ साली आमची कोर्टाने निर्दोष मुक्तता केली, याचं प्रकरणात एनआयए यांनी आणखी ज्या चार आरोपींना अटक केली होती. त्यांनाही आज कोर्टाने सोडलं. आम्ही बॉम्बब्लास्ट नाही केला, आज जे निर्दोष सुटले त्यांनीही नाही केला, तर मग बॉम्बस्फ़ोट कुणी केला, असा प्रश्न या प्रकरणात २०१६ साली निर्दोष मुक्ताता झालेले नुरूल हुदा यांनी उपस्थित केला.

## आरेफ आली....

केवळ राजकीय पक्ष नसून तो सर्वसामान्यांचा आवाज आहे. आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली बीड शहराच्या प्रगतीसाठी आणि तळागाळातील लोकांपर्यंत विकास पोहोचवण्यासाठी मेहनत घेत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात इनकमिंग वाढली आहे. य

दरम्यान, पक्षप्रवेशानंतर लगेचच आ. विजयसिंह पंडित यांनी आरेफ अली नगर परिसराची पाहणी करत जनतेशी थेट संवाद साधला. नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेत त्यांनी रस्ते, नाली, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांच्या कामांना प्राधान्य देत ती लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. शरातील व नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेत विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला.या पक्ष प्रवेश कार्यक्रमामुळे बीड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद अधिक वाढली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## कपिलधारवाडी येथे...

या महोत्सवासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून ह.भ.प. श्री हरिहारनंद भारती महाराज(मोरेश्वर संस्थान कोळवाडी), विश्वनाथ आप्पा सलगर (श्रीक्षेत्र कपिलधार), दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे(श्री दत्त संस्थान बालाघाट) यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच हरिपाठ, भजन, वाद्य व इतर धार्मिक कार्यक्रमांमध्येही अनेक कीर्तनसेवक सहभागी होणार आहेत. हा भव्य कीर्तन महोत्सव समस्त वाघेश्वरी तरुण मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थ, कपिलधारवाडी यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून, पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## माजलगाव विकास...

आणि वाढती जातीय तेढ ही गंभीर आव्हाने आहेत, असे ते म्हणाले. वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे, लोकशाहीतील चारही स्तंभ बळकट ठेवणे आणि सामूहिक नेतृत्वाला प्राधान्य देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना आवटे यांनी विविध प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली. कार्यक्रमादरम्यान आ. प्रकाशदादा सोळंके यांनीही आपले विचार व्यक्त करत बाबासाहेबांच्या विचारांमुळेच देशात शांतता व स्थैर्य टिकून आहे. महिलांना ५० टक्के राजकीय सहभाग देण्याची संकल्पना त्यांच्या तत्त्वज्ञानातूनच पुढे आली, असे सांगितले. या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्रा. अन्वर शेख, सभापती जयदत्त नरवडे, नगरसेवक राहुल लंगडे, रोहन घाडगे, इम्रान भैया, जुबेर खान, निलाताई, प्राचार्य डॉ. पॉलराज सर, इरफान पठान सर तसेच सुहास सोळंके यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रवीण मडके यांनी तर आभार प्रदर्शन सखाराम जोशी यांनी केले. संविधान, समता आणि वैज्ञानिक विचारांचा प्रभावी संदेश देणारा हा कार्यक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

## बीड जिल्ह्यातील...

लवकर शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदन देताना परिषदेचे सचिव श्री. तुषार पाटील, विश्वस्त श्री. जी. व्ही. मस्के तसेच परिषदेचे तालुका उपाध्यक्ष श्री. डॉ. बी. आर. बांड व अन्य सदस्य उपस्थित होते.

## जनावरे चोरी....

पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींची नावे अशीम जाफर कुरेशी (महमदीया कॉलनी), अजिम आझाद कुरेशी (महमदीया कॉलनी) आणि शहनवाज एजाज कुरेशी (कुरेशी मोहल्ला, पेठ बीड) अशी आहेत. या प्रकरणी फिर्यादी सईद अब्दुल करीम कुरेशी (मोमीनपुरा) यांच्या तक्रारीवरून पेठ बीड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत एक गोवंशीय गो-हे (१५,०००) आणि बोलेरो पिकअप वाहन (४,००,०००) असा एकूण ४,१५,००० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार माने करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर व त्यांच्या पथकाने केली.

## बीड जि.प....

पूर्णाकृती पुतळा बसविण्याचा ठराव पास करण्यात येवून मान्यता देण्यात आली आहे. ही बाब अभिनंदनिय असून बीड जि.प.ने घेतलेल्या निर्णयाचे रिपाइंच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे. वास्तविक पाहता थोर महापुरुषांचे पुतळे पुर्णाकृती बसविणे महत्वाचे आहे. शोषीत,पीडित उपेक्षीत समाज बांधवांना त्यांचे न्याय, हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी व सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, परिवर्तनासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महापुरुषांचे ४ फुटी अर्धाकृती पुतळे बसविण्याचा ठराव बीड जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेमध्ये पास करण्यात आला आहे. फुले, शाहू, आंबेडकर या थोर महापुरुषांच्या पुतळ्याची ठरावात मंजूर करण्यात आलेली ४ फुटाची उंची वाढवून बीड जिल्हा परिषदेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या परिसरात छ.शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे १२ फुटी पूर्णाकृती पुतळे बसविण्यात यावेत. अशी मागणी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## बीड जिल्ह्यात ....

व शिक्षकेतर संघटनांनी या संपात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला आहे. त्यामुळे संप पूर्णपणे यशस्वी झाल्याचा दावा समन्वय समितीकडून करण्यात आला आहे. समितीच्या पदाधिकार्यांनी सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे. तसेच राज्यभरात या आंदोलनाचा प्रभाव वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बीड जिल्ह्यात सुरू झालेल्या या बेमुदत संपामुळे प्रशासनावर मोठा ताण निर्माण झाला असून सामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर थेट परिणाम झाला आहे. सरकारकडून यावर काय भूमिका घेतली जाते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सांस्कृतिक कार्य विभागाचा उपक्रम;शहाजीराजे भोसले जयंतीनिमित्त 'स्वराज्य संकल्प महोत्सवाचेभव्य आयोजन

## लोककलावंतांच्या सादरीकरणातून स्वराज्य संकल्पाचा प्रेरणादायी इतिहास उलगडणार




**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय तर्फे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या ४३२ व्या जयंतीनिमित्त 'स्वराज्य संकल्प महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून स्वराज्याच्या संकल्पनेचा इतिहास, परंपरा आणि प्रेरणादायी विचार लोककलेच्या माध्यमातून सादर केले जाणार आहेत. हा कार्यक्रम सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ रोजी भोंडवे पाटील प्रांगण, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

'स्वराज्य संकल्प महोत्सव' हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून, स्वराज्याच्या उदात्त विचारांची नव्या पिढीपर्यंत पोहोच घडविणारा आणि समाजात देशभक्ती, शौर्य व स्वाभिमान या मूल्यांची जाणीव निर्माण करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. सुमारे ५० लोककलावंतांच्या सहभागातून सुसज्ज व नेत्रदीपक वीरश्रीप्रधान कलाप्रदर्शन सादर केले जाणार असून, प्रेक्षकांना इतिहासाची जाणीव आणि प्रेरणा मिळणार आहे.

हा कार्यक्रम सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ रोजी भोंडवे पाटील प्रांगण, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात विविध लोककला प्रकारांच्या सादरीकरणातून स्वराज्य संकल्पनेचा प्रभावी आविष्कार सादर होणार आहे.

सदर कार्यक्रम सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभाग सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असून, राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव करण्याचा प्रयत्न यामधून करण्यात येत आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला व विनामूल्य ठेवण्यात आला असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय बिभीषण चवरे यांनी केले आहे.

# कृषीकुल आधुनिक शेतीचे विद्यापीठ; देशभरातील शेतकऱ्यांसाठी परिवर्तनाचे केंद्र

## पालघर येथील ४८ शेतकऱ्यांचे यशस्वी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण

**परळी वै. । प्रतिनिधी**

ग्लोबल विकास ट्रस्टच्या सिरसाळा येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्राने आधुनिक व शाश्वत शेतीचे एक प्रभावी आणि आदर्श मॉडेल उभे केले आहे. बीड जिल्ह्यापुरते मर्यादित न राहता हे केंद्र आता संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. परिणामी, येथे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. पारंपरिक शेतीतून मिळणारे मर्यादित उत्पन्न लक्षात घेता, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, पिक पद्धतीतील बदल आणि नव्या संधींचा शोध अत्यावश्यक ठरतो.



याच दृष्टीने कृषीकुल शेतकऱ्यांना तंत्रशुद्ध, सखोल आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मार्गदर्शन देत त्यांना सक्षम बनविण्याचे काम करत आहे.नुकतेच पालघर जिल्ह्यातील ४८ शेतकरी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी कृषीकुल येथे दाखल झाले. या प्रशिक्षणात रेशीम शेतीचे सर्वांगीण मार्गदर्शन देण्यात आले. जमिनीची तयारी, आळी संगोपन, रेशीम शेड उभारणी, व्यवस्थापन, रोग ओळख व प्रतिबंध तसेच कोष संकलन यांसारख्या प्रत्येक टप्प्यावर प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

### उच्च दर्जाचे प्रशिक्षण संकुल; देशभरातून शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद

**सिरसाळा येथील कृषीकुल हे जागतिक दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र असून, येथे फळबाग लागवड, जल व मृदा संधारणा तसेच रेशीम शेतीचे सखोल व प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि कोकण विभागांसह गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांनी येथे प्रशिक्षण घेऊन आधुनिक शेतीत यश संपादन केले आहे.**

# विध्यार्थ्यानी पदवी बरोबरच विशेष कौशल्य आत्मसात करावेत: प्राचार्य डॉ. पंडीत खाकरे

### • चौसाळा महाविध्यालयात पदवी वितरण कार्यक्रम संपन्न

**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा येथील कला व विज्ञान महाविध्यालयात दि. २२/०४/२०२६ रोजी पदवी प्राप्त विध्यार्थ्यांचा पदवी वितरण सोहळा २०२६ महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांच्या उपस्थितीत पार पडला या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात विध्यापीठध्वज फडकावून



विद्यापीठगीताने झाली. या वेळी बोलताना डॉ. खाकरे यांनी ग्रामीण भागातील विध्यार्याने महाविध्यालयीन विध्यापीठाची पदवी बरोबरच व्यवसाय कौशल्य आत्मसात करावीत. पदव्या घेऊन नोकऱ्या शोधण्यापेक्षा कौशल्य आत्मसात करून यशस्वी होण्याचा सल्ला दिला. व्यवसायभिमुख शिक्षण काळाची गरज असून सुधारित शेती सुद्धा करावी असे नमूद केले. यावेळी डॉ. सुधाकर वनवे यांनी ही मार्गदर्शन केले. कला व विज्ञान शाखेच्या विध्यार्थ्यांना पदवी वितरण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माणिक चव्हाण यांनी केले. तसेच सूत्रसंचालन डॉ. विलास भिल्लारे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रशांत साबळे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी विद्यार्थी प्राध्यापक मोठ्या संखेने उपस्थित होते.

## पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा रविवारी (दि.२६)

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर व अखिल भारतीय श्रीस्वामी समर्थ गुरूपीठ, त्र्यंबकेश्वर, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.२६ रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा जाबिंदा मैदान, बीड बायपास, शहानुरमिया दर्गा जवळ,छत्रपती संभाजीनगर येथे आयोजीत करण्यात आला आहे.

# बलभीम महाविद्यालयाची खेळाडूंना आर्थिक मदत

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या रग्बी संघात बलभीम महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंचा समावेश होता.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रग्बी क्रीडा स्पर्धेसाठी येडे सूरज राजाभाऊ, जाधव यश बाळासाहेब, मुळूक अतुल, सतीश गिरे, संभाजी विनोद व नागरे अनिकेत संजय तसेच मुलींच्या संघामध्ये राधा हरिदास दिवे या सर्व खेळाडूंचा समावेश होता. या स्पर्धा भुवनेश्वर येथे संपन्न झाल्या. या सर्व खेळाडूंना



महाविद्यालयाच्या वतीने प्रत्येकी पाच हजार रुपये आर्थिक मदत करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांच्या हस्ते सदरील विद्यार्थ्यांना धनादेश वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, आय. क्यु.ए.सी.समन्वयक डॉ.अनिल चिंधे व क्रीडा विभागप्रमुख डॉ. जगन्नाथ तत्तापूरे यांची उपस्थिती होती.

## मंडूबाई उमाजीराव मोरे यांचे वृद्धापकाळाने निधन



**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका येथील जुन्या पिढीतील जाणत व्यक्तिमत्त्व असलेले प्रेमळ, अध्यात्मिक सर्वांना आपल्या मायेच्या सावलीने आधार देणाऱ्या मंडूबाई उमाजीराव मोरे यांचे वयोमानानुसार १०५ व्या वर्षी राहत्या घरी २० एप्रिल २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

# सौ. के.एस.के. महाविद्यालयामध्ये भव्य पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळयाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

सौ. के.एस.के. महाविद्यालया मधील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या पदवीप्राप्त विद्यार्थ्यांसाठी शुक्रवार दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ ज्या विद्यार्थ्यांनी पदवी व पदव्युत्त शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या यशोगाथेचा सन्मान करण्यासाठी हा विशेष सोहळा संपन्न होणार आहे.

या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून नवगण शिक्षण संस्थेचे सचिव मा. योगेश क्षीरसागर हे उपस्थित राहणार आहेत तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. सुहास मोराळे स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड हे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन आपले पदवी प्रमाणपत्र घ्यावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्त विभाग प्रमुख डॉ. खान ए. एस. यांनी केले आहे. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी हे व्यासपीठ सज्ज झाले आहे.

# विभागीय हातमाग कापड स्पर्धा, पैठणी आणि हिमरु शाल ठरली विजेती





**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग विभाग यांच्यावतीन विभागीय हातमाग कापड स्पर्धा व बक्षीस योजनेअंतर्गत सन २०२५-२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत मुजक्कीर आमेर शमीम अहेमद गिराम यांच्या पैठणी साडीस प्रथम क्रमांक, अजिज अहमद गुलाम यांच्या पैठणी साडीस द्वितीय क्रमांक तर इम्रान अहमद कुरेशी यांच्या हिमरु शालीला तृतीय क्रमांक मिळाला. मंगळवारी (दि.२१) रोजी ही स्पर्धा पार पडली. विभागीय हातमाग कापड स्पर्धा देवगिरी नागरी सहकारी बँक प्रशिक्षण केंद्र क्रांती चौक येथे पार पडली. हातमागावर आपली वस्त्र कला जोपासणाऱ्या कलावंतांना प्रोत्साहन देणे व त्यांच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी ही स्पर्धा भरविली जाते. या स्पर्धेत सादर झालेल्या उत्कृष्ट कला नमुन्यांना पारितोषिक दिले जाते. स्पर्धेच्या परीक्षक मंडळात विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे, प्रादेशीक उपायुक्त वस्त्रोद्योग वसंत घुले, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहाय्यक आयुक्त वस्त्रोद्योग प्रशांत सदाफुले,विणकर सेवा केंद्राचे योगेश राठोड आदींचा समावेश होता. या परीक्षक मंडळाने दिलेल्या क्रमानुसार मुजक्कीर आमेर शमीम अहेमद गिराम यांच्या पैठणी साडीस प्रथम क्रमांक, अजिज अहमद गुलाम यांच्या पैठणी साडीस द्वितीय क्रमांक तर इम्रान अहमद कुरेशी यांच्या हिमरु शालीला तृतीय क्रमांक मिळाला. प्रथम क्रमांकास २५ हजार रुपये. द्वितीय क्रमांकास २० हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये पारितोषिक दिले जाते.

या स्पर्धेत एकूण २६ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यात हातमागावर बनविलेले विविध वस्त्रप्रावरणे सादर करण्यात आले होते. पैठणी कारागिरांच्या कलेला योग्य ते मूल्य मिळावे व त्यांच्या उत्पादनांना विविध ठिकाणी चालना देण्यासाठी विभागस्तरावर प्रयत्न व्हावे, असे मत डॉ. गव्हाणे यांनी व्यक्त केले. नामांकीत पैठणी कारागीर कविता ढवळे, वस्त्रोद्योग विभागाचे शेख एजाज, श्रीमती रेणूका कुंजर तसेच अनेक कलावंत व नागरिक उपस्थित होते. प्रशांत सदाफुले यांनी उपस्थितांचे आभार मानले.


मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

**बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.**

**जनरेटर खरेदी निविदा**

महाविद्यालयाला १२५ के. व्ही. डिजेल जनरेटर (DG Set) खरेदी व बसवीणे या कामासाठी पात्र व अनुभवी पुरवठादाराकडुन सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. इच्छुक कंत्राटदारांनी आवश्यक कागदपत्रांसह निविदा अर्ज दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सायं. ०५.०० पर्यंत महाविद्यालयाच्या भांडार विभागात सादर करावी.

**नोट :** १) महाविद्यालय कोणतीही निविदा स्वीकृत किंवा नामंजूर करण्याचा पूर्ण अधिकार राखून ठेवते.

(स्वाक्षरीत)
**प्राचार्य**
**बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.**

**दैनिक मराठवाडा पत्र** दि. १८/०२/२०२५

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
**Older name -** KULKARNI ONKAR CHANDRAKANTRAO
**New name -** KULKARNI ONKAR CHANDRAKANT
**Address:** S/O: Chandrakant Kulkarni, Kabad Galli, Beed, Dist. Beed, Maharashtra - 431122
**Mobile- 7385548028**


## जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ५० / २०२६**

**शहाबाई भ्र. लक्ष्मण सोनवणे वि. निरंक**

अर्जदार : **१) शहाबाई भ्र.लक्ष्मण सोनवणे वय ७६ वर्ष, धंदा घरकाम, रा. खांबा पो. खालापुरी ता. शिरुर (का) जि. बीड. २) सुदाम पि.लक्ष्मण सोनवणे, वय - ४४ वर्ष, धंदा - शेती, रा. सदर, ३) संदिप पि.लक्ष्मण सोनवणे, वय - ३० वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ४) मंगलबाई भ्र. भास्कर तांदळे वय - ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. वंजारवाडी ता.जि. बीड. ५) लता भ्र. बाजीराव थोरवे, वय - ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. खांबा पो. खालापुरी ता. शिरुर (का) जि. बीड**

अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ऑक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत

ज्यापोक्षा मयत नामे लक्ष्मण पि.कारभारी सोनवणे, यांचा मृत्यू दि. १६-०९-२०२५ रोजी मौजे खांबा पो. खालापुरी ता.शिरुर (का)जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा धैवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक१६.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर **प्रकरणात पुढील तारीख ०८.०५.२०२६ ही आहे.**

**(अँड. डी. एम. रोटे)**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर शिरूर**

**शिक्का** **(स्वाक्षरीत)** **क. लिपीक**

## जाहिर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ५८० / २०२६**

CNR No. MHBI020000113220 26

**अतुल महादेव भोसले वि. निरंक**

अर्जदार :- **१. अतुल पि. महादेव भोसले, वय - ३७ वर्ष, धंदा शेती, रा. पोखरी घाट पो. लिंबागणेश ता. जि.बीड २. राहुल पि. महादेव भोसले, वय-३८ वर्ष, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे. ३. वैशाली भ्र. विनोद वाघमारे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सौदाना ता. जि. बीड. ४. त्रिशाला भ्र. राजाराम वाघमारे, वय-३० वर्षे, धंदा घरकाम, रा. आहेर वडगाव ता. जि. बीड**

**विरुध्द निरंक**

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात महादेव मोहन भोसले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत महादेव मोहन भोसले यांचा मृत्यु दिनांक २५/०१/२०२६ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. ३ व ४ या मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत महादेव मोहन भोसले यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **प्रकरणातील पुढील तारीख ११ /०६/ २०२६**

आज दिनांक १३ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **(मार्फत अँड. की. बी. पारगांवकर)**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत)** **क. लिपीक**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरुवार दि. २३ एप्रिल २०२६ ●



**एम एस ई बी च्या गलतन काम काजामुळे नागरिकांचे हाल मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिकल साहित्याचे नुकसान होत आहे. सतत नाळवंडी नाका या परिसरामध्ये सतत लाईट जात आहे व अचानक येणाऱ्या हाय व्होल्टेज मुळे घरातील फॅन कूलर तसेच टीव्ही फ्रिज या साहित्याची हाय व्होल्टेज मुळे जळून ग्राहकांचे जनतेचे नुकसान होत आहे यावरती एम एस ई बी कर्मचारी तसेच अधिकारी काही उपयोजना करतील का नागरिकाच्या या मोठ्या झालेल्या लुस्कनेची एम एस ई बी भरपाई देणार का पहिल्यापासून हवा किंवा विजेचा कडकडे झाला की एम एस सी बी ची लाईट गुल होते या समस्येमुळे नागरिकांची मोठे हाल होत आहेत काही वेळे ला काही भागात होलटे गुल आसा कारभार चालू आहे**

# कपिलधारवाडी येथे 5 दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

सर्व भाविक भक्तांना आध्यात्मिक आनंदाची पर्वणी ठरणारा ५ दिवसीय भव्य कीर्तन महोत्सव कपिलधारवाडी येथे आयोजित करण्यात आला आहे. ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभहस्ते व अध्यक्षतेखाली श्री वाघेश्वरी मातांच्या कलशारोहणा वर्धापन दिनानिमित्त हा महोत्सव संपन्न होत आहे.

हा कीर्तन महोत्सव शनिवार दि. २५ एप्रिल २०२६ ते बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. दररोज सकाळी काकडा भजन, गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकीर्तन व त्यानंतर हरिजागर असा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाच्या दरम्यान विविध नामांकित कीर्तनकारांची कीर्तने



होणार आहेत. शनिवार दि. २५ एप्रिल रोजी ह.भ.प. गणेश महाराज अस्वले बंकटस्वामी मठ संस्थान नेकनुर, रविवार दि. २६ एप्रिल रोजी ह.भ.प. शुभम महाराज वसंतगडकर, सोमवार दि. २७ एप्रिल रोजी ह.भ.प. मनीषाताई डांगे सोनेसांगवी पुणे, तर मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी ह.भ.प. भाग्यश्री मोहिते परभणी यांची कीर्तने सेवेचे आयोजित करण्यात आली आहेत.बुधवार दि. २९ एप्रिल रोजी सकाळी१० ते १२ या वेळेत ह.भ.प. गुरु. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून या पाच दिवसीय कीर्तन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव विकास प्रतिष्ठान तर्फे भारतीय संविधान आणि आजचे वर्तमान या विषयावर व्याख्यान संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भारतीय संविधान आणि आजचे वर्तमान या विषयावर विचारप्रवर्तक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. माननीय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सायंकाळी ६ वाजता पार पडलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून सामाजिक विचारवंत श्रीरंजन आवटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या प्रभावी व अभ्यासपूर्ण व्याख्यानातून त्यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत समाजाने त्याच्या जपणुकीसाठी सदैव सजग राहण्याची गरज व्यक्त केली. संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून देशाचा सोपा आणि स्पष्ट मार्गदर्शक नकाशा आहे, असे सांगत त्यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची सखोल मांडणी केली. प्रस्ताविकात नीला देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य हे कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी दिशादर्शक असल्याचे नमूद केले. त्यांनी आंबेडकरांनी महिलांना समान हक्क देण्यासाठी केलेल्या ऐतिहासिक कार्यावरही प्रकाश टाकला. आपल्या भाषणात आवटे यांनी सध्याच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीवर भाष्य करत काही ठळक मुद्दे उपस्थित केले. आज देश एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. बेरोजगारी, हमीभावाचा अभाव, सुरक्षेची कमतरता ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप २०२५ पीक विमा व हेक्टरी मदतीसाठी निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

खरीप २०२५ हंगामात बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. मात्र अद्यापही शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम तसेच मुख्यमंत्री यांनी जाहीर केलेली हेक्टरी १७ हजार ५०० रुपयांची मदत मिळालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर स्वराज्य जनजागृती परिषदेमार्फत जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन तसेच जिल्हा कृषी अधिकारी श्री. साळवे तसेच स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष श्री. ॲड अजित देशमुख यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी शासनाने पीक विम्यातील ट्रिगर प्रणाली बंद केल्यामुळे शेतकऱ्यांना केवळ पीक कापणी प्रयोगाच्या आधारे विमा मिळणार होता. परंतु खरीप हंगाम संपून बराच कालावधी उलटल्यानंतरही शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम जमा झालेली नाही. तसेच मुख्यमंत्री यांनी जाहीर केलेली हेक्टरी १७ हजार ५०० रुपयांची मदतही अद्याप मिळालेली नाही. यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची अवस्था अधिक बिकट झाली असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विमा व जाहीर केलेली मदत त्वरीत वितरित करावी, अशी मागणी स्वराज्य जनजागृती परिषदे मार्फत शासनाकडे करण्यात आली आहे. लवकरात ▶▶ उर्वरित पान २ वर

### बीड – गेवराईतील बिअर बारवर धाड ; मालकावर गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गेवराई येथील पाचेगाव रोडवरील बिअर बारवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने धाड टाकून तीन अल्पवयीन बालकामगारांची सुटका केली आहे. पोलीस पथकाने ही कारवाई केली. या कारवाईत मध्य प्रदेशातील खांडवा जिल्ह्यातील १४ ते १५ वर्षे वयोगटातील तीन मुले वेटरचे काम करताना सापडले. बार मालक आणि मॅनेजर यांनी या मुलांना असुरक्षित ठिकाणी कामाला लावून त्यांची पिळवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी मिरा महादेव रेडेकर यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात बालकामगार प्रतिबंधक कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हॉटेल व्यवसायासाठी अल्पवयीन मुलांचा वापर करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कडक पावले उचलली असून पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# जनावरे चोरी करणाऱ्या तिघांना अटक, बोलेरोसह ४.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**


पेठ बीड पोलिसांनी जनावरे चोरी करणार्या टोळीचा पर्दाफाश करत तिघांना अटक केली असून त्यांच्याकडून एकूण ४,१५,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात गोवंशीय जनावरे व बोलेरो पिकअप



वाहनाचा समावेश आहे. दि. २०/०४/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक मारुती खेडकर हे स्टाफसह पेट्रोलिंग करत असताना त्यांना माहिती मिळाली की जी.एन. फंक्शन हॉल परिसरात जनावरे चोरी करणारी टोळी पकडली गेली आहे. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळीएमएच-२३ एयू-१०१५ क्रमांकाची बोलेरो पिकअप आणि त्यामध्ये चारही पाय दोरीने बांधलेले गोवंशीय गो-हे आढळून आले. चौकशीदरम्यान हे गो-हे कत्तलीसाठी नेले जात असल्याचे स्पष्ट झाले. ▶ उर्वरित पान २ वर

### बीड जि.प. मध्ये महापुरुषांचे पूर्णाकृती पुतळे बसविण्यात यावेत:पप्पु कागदे

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय ईमारतीच्या परिसरामध्ये छत्रपती शाहु महाराज, महात्मा जोतिबा फुले, व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या तिन्ही महापुरुषांचे १२ फुटी पूर्णाकृती पुतळे बसविण्यात यावेत. अशी मागणी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केली आहे. बीड जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय ईमारतीच्या परिसरामध्ये छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ४ फुटी अर्धाकृती पुतळे, छत्रपती संभाजीराजे भोसले यांचा १२ फुटी पूर्णाकृती पुतळा, लोकनेते स्व गोपीनाथराव मुंडे व लोकनेते सुंदरराव सोळंके यांचा १० फुटी ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यात सरकारी व निमसरकारी कर्मचार्यांचा बेमुदत संप ; प्रशासकीय यंत्रणा ठप्प

**बीड । प्रतिनिधी**

जुन्या पेन्शन योजनेसह विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्य सरकारी, निमसरकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती, जिल्हा बीड यांच्या वतीने आजपासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. या संपाला जिल्ह्यातील कर्मचार्यांचा अभूतपूर्व आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा ठप्प झाल्याचे चित्र दिसून आले.

संपामुळे जिल्ह्यातील बहुतांश शासकीय कार्यालये पूर्णपणे बंद किंवा अत्यल्प कर्मचार्यांच्या उपस्थितीत कार्यरत असल्याचे दिसून आले. जिल्हा परिषद, तहसील कार्यालये, पंचायत समित्या तसेच विविध शासकीय विभागांमध्ये कामकाज ठप्प झाले आहे. आरोग्य विभागावरही संपाचा मोठा परिणाम झाला असून अनेक ठिकाणी बाह्यरुग्ण सेवा (OPD) विस्कळीत झाल्याची माहिती मिळाली आहे. काही



ठिकाणी आपत्कालीन सेवा सुरू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र कर्मचारी अभावामुळे अडचणी निर्माण झाल्या. संपाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी शेकडो कर्मचारी सहभागी झाले होते. जुन्या पेन्शनची हमी पूर्ण करा, सरकारने दिलेली आश्वासने पाळा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. समन्वय समितीच्या म्हणण्यानुसार, राज्य शासनाने यापूर्वी जुन्या पेन्शन योजनेसारखी सामाजिक सुरक्षा देणारी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप अपूर्ण आहे. याआधी मार्च २०२३ मध्ये झालेल्या सात दिवसांच्या संपानंतर सरकारने सकारात्मक भूमिका घेत त्रिसदस्यीय समिती स्थापन केली होती. तसेच १४ डिसेंबर २०२३ रोजीच्या आंदोलनावेळीही सुधारित योजनेचे आश्वासन देण्यात आले होते. तरीही प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने कर्मचार्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. या संपादरम्यान पुढील प्रमुख मागण्या पुन्हा अधोरेखित करण्यात आल्या आहेत- १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त कर्मचार्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे शिक्षकांना १०-२०-३० लाभांची आश्वासित प्रगती योजना लागू करणे, राज्यातील रिक्त पदांची तातडीने भरती करणे १० वर्षांहून अधिक सेवा देणार्या कंत्राटी कर्मचार्यांचे नियमितीकरण करणे अंशतः व विनाअनुदानित शाळांना १००% अनुदान देणे जिल्ह्यातील विविध शासकीय, निमसरकारी, शिक्षक ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या आदित्य फार्मसी कॉलेजचा 'नॅशनल' डंका; 7 विद्यार्थी GPAT परीक्षेत यशस्वी

**जिद्द आणि मेहनतीला कष्टाची जोड ; नॅशनल रँकिंग, उच्च शिक्षणाचे मार्ग मोकळे**



**बीड । प्रतिनिधी**

नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत (NTA) घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील GPAT 2026 (ग्रॅज्युएट फार्मसी ॲप्टिट्यूड टेस्ट) परीक्षेत बीडच्या आदित्य फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या निकालाने जिल्ह्याच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. या कठीण परीक्षेत आदित्य फार्मसी कॉलेजच्या तब्बल सात विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.यामध्ये येलदेपवाड व्यंकटरामन प्रकाश, संतोष दत्ताराव गवळी, संग्रामसिंह दशरथ भाटेकर, ज्ञानेश्वर विश्वम्भर विघ्ने, खुशी वीरेंद्र यादव, ओंकार उद्धवराव डाके, ओंकार मछिंद्र जगताप या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

> **विद्यार्थ्यांच्या यशामुळे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावला आहे. त्यांनी भविष्यातही अशीच उत्तुंग कामगिरी करत राहावी. या यशाने संस्थेतील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.**
> **–डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था, बीड.**

या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. GPAT ही परीक्षा फार्मसी क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.या परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना देशातील 'नायपर' (NIPER) सारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रवेशाची संधी मिळते. तसेच पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा मार्गही मोकळा होतो.विद्यार्थ्यांची जिद्द आणि महाविद्यालयाने पुरवलेल्या आधुनिक शैक्षणिक सुविधांमुळेच हे यश शक्य झाले आहे. हे यश विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाचे फलित आहे. आमचे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच तत्पर असते. विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे आज खऱ्या अर्थाने चीज झाले असे आदित्य फार्मसी कॉलेज चे प्रचार्य डॉ. दीपक पवार यावेळी म्हणाले. तर आदित्य फार्मसी कॉलेज प्राचार्य डॉ. कुमार सुरवसे म्हणले की, GPAT सारखी स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होणे म्हणजे विद्यार्थ्यांची गुणवत्ता राष्ट्रीय स्तरावर सिद्ध होणे होय. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे.